**(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

**मुंबई उच्च न्यायालाच्या न्यायाधिकारात**

**फौजदारी अधिकार क्षेत्र**

**फौजदारी रिट याचिका क्र. १७९५/२०११**

श्रीमती रेखा जनार्दन काळे,

राहणार: माही जळगाव

तालुका: कर्जत, जि. अहमदनगर . ..... याचिकाकर्ते

विरुद्ध

१. महाराष्ट्र राज्य

२. गणेश अरविंदराव मोरे,

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,

बारामती शहर पोलीस स्टेशन,

बारामती, जि. पुणे.

3. वरिष्ठ पोलीस निरीक्षक,

कर्जत पोलीस स्टेशन,

कर्जत, जि. अहमदनगर.

४. पोलीस उपअधीक्षक,

बारामती, पुणे ग्रामीण, पुणे.

५. पोलीस अधीक्षक,

पुणे ग्रामीण, पुणे

६. पोलीस उपअधीक्षक (गुन्हे अन्वेषण विभाग),

महाराष्ट्र राज्य, पुणे.

७. बाळासाहेब सरजेराव थोरात , सहायक उपनिरीक्षक,
सध्या दौंड पोलीस स्टेशन,
दौंड, पुणे ग्रामीण, पुणे येथे कार्यरत.
८. शिवाजी राजाराम निकम,
पोलीस कॉन्स्टेबल ब. क्र. ९६५
सध्या वडगाव निंबाळकर पोलीस ठाणे,
बारामती, पुणे ग्रामीण येथे कार्यरत
९. भानुदास विठ्ठल जगदाळे,
पोलीस कॉन्स्टेबल ब. क्र.२०८
१०. संदिप जगन्नाथ कदम,
पोलीस कॉन्स्टेबल ब. क्र.२१४
११. संदिप चंद्रकांत जाधव,
पोलीस कॉन्स्टेबल ब. क्र. २२०
१२ . रमेश बाबुराव केकाण,
पोलीस कॉन्स्टेबल, ब. क्र.१०७५
(उत्तरवादी क्र. ९ ते १२ –
सध्या- वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन,
बारामती, पुणे ग्रामीण, पुणे येथे कार्यरत)

.....

श्री. कुलदिप एस. पाटील यांच्या समवेत याचिकाकर्त्यांसाठी श्री. प्रशांत एस. हजारे, श्रीमती. पुष्करणी कुलकर्णी यांच्या कडून निर्देशित

श्री. के. व्हि. सस्ते, सहाय्यक सरकारी अभियोक्ता प्रतिवादी क्रमांक १, ३, ४, ५ आणि राज्याकरिता.

उत्तरवादी क्र. ०२ करिता श्री. ए.पी. मुंदर्गी, वरिष्ठ अधिवक्ता व श्री. राहुल एस. काटे यांच्याकडून निर्देशित

श्री. आर. डी. सुर्यवंशी, उत्तरवादी क्र.७ ते १२ करिता.

**न्यायवृंदः न्यायमूर्ती श्री. ए. एस. ओक आणि**

**न्यायमूर्ती श्री.  श्रीहरी पी. डावरे**

**न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक : २७ मार्च २०१२**

**३१ मार्च २०१२ आणि ०२ एप्रिल २०१२ रोजी न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात वाचून दाखविला.**

**मौखिक न्यायनिर्णय  (न्यायमूर्ती श्री. ए.एस. ओक द्वारा):**

१. पूर्वीच्या आदेशांनुसार, आम्ही हि रिट याचिका अंतिम सुनावणीसाठी  घेतली आहे.रिट याचिका घेणाऱ्या नियमित खंडपीठाला ही याचिका स्वीकारता आली नाही आणि म्हणूनच, माननीय मुख्य न्यायाधीशांनी पारित केलेल्या सर्वसाधारण   आदेशानुसार, ही याचिका या खंडपीठाकडे सोपवण्यात आली आहे.

२. पोलीस हे कायदा आणि स्वातंत्र्याचे अभिरक्षक आहेत की संरक्षक, किंवा ते स्वतःच कायदा आहेत का, असे आत्मपरीक्षण करावयास लावणारे प्रश्न ह्या याचिकेत उपस्थित केले आहेत. हे आणखी एक प्रकरण आहे ज्यात भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत मूलभूत हक्कांची पायमल्ली आणि उघड उल्लंघन या न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

३. आपल्यासमोर उद्भवलेल्या दुःखद आणि शोक पूर्ण परिस्थिती जाणून घेण्यापूर्वी, या याचिकेतील तथ्यात्मक वादाची चौकशी करणे आवश्यक आहे.

४. हा वाद अहमदनगर जिल्ह्यामधील  कर्जत तालुक्यातील माही जळगाव येथील रहिवासी जनार्दन काळे यांच्या कोठडीत झालेल्या मृत्यूशी संबंधित आहे. सध्याची  याचिकाकर्ती ही जनार्दनची विधवा पत्नी आहे. याचिकेत असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, जनार्दन

यांच्या पश्चात याचिकाकर्ती आणि चार अल्पवयीन मुली आहेत, ज्यांचे वय याचिकेत नमूद केल्यानुसार अनुक्रमे ९,८,६ आणि ५ आहे. उत्तरवादी क्रमांक २ हे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आहेत जे त्या वेळी पुणे जिल्ह्यातील बारामती पोलीस स्टेशनशी संलग्नित होते. उत्तरवादी क्रमांक ३ म्हणून त्याच्या अधिकृत क्षमतेनुसार त्यांना पक्षकार बनवले आहे. उत्तरवादी क्रमांक ४, ५ आणि ६ हे अनुक्रमे उप. पोलीस अधीक्षक, बारामती, पुणे ग्रामीण, पुणे, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे आणि उप. पोलीस अधीक्षक (गुन्हे अन्वेषण विभाग ), पुणे, महाराष्ट्र राज्य म्हणून कार्यरत आहेत. उत्तरवादी क्र. ७ बाळासाहेब थोरात हे त्या वेळी बारामती पोलीस स्टेशनमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. उत्तरवादी क्रमांक ८ ते १२ हे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून संबंधित पोलीस स्टेशनला त्या वेळी संलग्न होते.

५. याचिके मध्ये असे म्हटले आहे की, याचिकाकर्ती आणि तीचे मृत पती जनार्दन हे अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील माही-जलगाव येथे राहत होते. जनार्दन हे मोलमजुरी करून उदरनिर्वाह करत असत. प्रकरण असे आहे की, पुणे जिल्ह्यातील बारामती पोलिस ठाण्याशी संलग्न असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांनी १४ जून २०१० रोजी उक्त जनार्दनला जबरदस्तीने बंदिस्त केले. याचिकाकर्तीचा असा आरोप आहे की, सदर वेळी बारामती पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस कॉन्स्टेबल निकम (उत्तरवादी क्र. ८) यांनी याचिकाकर्तीला तिच्या भ्रमणध्वनीवर सतत फोन करून तिच्या पतीला सोडवण्यासाठी १० लाख रुपयांची मागणी केली. याचिकाकर्तीचे वडील विश्वनाथ भाऊ काळे हे त्याच गावचे रहिवासी असून ते शेतजमीन, घर आणि बोलेरो जीपचे मालक असल्याचे नमूद केले आहे. आरोप असा आहे की, बारामती पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी तिच्या भ्रमणध्वनीवर पैसे देण्याची मागणी केली होती आणि मागणी पूर्ण न झाल्यास मृत जनार्दनला विविध प्रकरणांमध्ये अडकवण्याची धमकीही देण्यात आली होती.

६. याचिकेच्या परिच्छेद ४ मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, १६ जून २००९ रोजी सकाळी याचिकाकर्तीला उत्तरवादी क्र. ८ कडून तिच्या ९९६०८७७९२२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर दूरध्वनी करण्यात आला की, पोलीस जनार्दनसह माही जळगाव गावात पोहोचणार आहेत. जर पैशांची मागणी पूर्ण झाली नाही तर त्याचे गंभीर परिणाम होतील आणि तिला आणि तिच्या पतीला अनेक गुन्ह्यांमध्ये अडकवले जाईल, अशी धमकी याचिकाकर्तीला देण्यात आली होती. असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की १६ जून २००९ रोजी जनार्दनला बारामती पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी MH ४२/H १३८४ अशी नोंदणी असलेल्या खासगी सुमो वाहनाने सदर पोलीस ठाण्यातून नेले होते. त्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी जनार्दनला जामखेडला नेले, जिथे याचिकाकर्तीची बहीण रेश्मा उर्फ ताई परशुराम पवार राहते. बारामती पोलिस ठाण्याच्या अधिकार्‍यांनी रेश्माच्या घरातून एक डीव्हीडी प्लेअर जप्त केला आणि सकाळी ९.३० ते १०.३० वाजेच्या सुमारास जनार्दनला याचिकाकर्तीच्या वडिलांच्या घरी नेण्यात आले. पोलीस अधिकाऱ्यांनी याचिकाकर्तीच्या वडिलांना सांगितले की ते रेश्माला बारामतीला घेऊन जात आहेत.त्यामुळे याचिकाकर्तीच्या वडिलांनी त्यांना त्यांच्यासोबत येणार असल्याचे सांगितले. त्यानुसार, याचिकाकर्तीचे वडील आणि तिची बहीण त्यांच्या स्वत:च्या बोलेरो गाडीने पुढे निघाले जी बारामती पोलिस स्टेशनशी संलग्न असलेले पोलिस कॉन्स्टेबल रमेश केकाण चालवत होते जे या याचिकेतील उत्तरवादी क्रमांक १२ आहेत. असे नमूद केले आहे की उत्तरवादी क्रमांक ८ ने याचिकाकर्तीला सांगितले की त्यांनी तिच्या वडिलांना आणि बहिणीला अटक केली आहे. आरोप असा आहे की, उत्तरवादी क्रमांक ८ याने याचिकाकर्तीला वारंवार फोन करून पैशांची सतत मागणी केली होती.

७. १६ जून २००९ रोजी दुपारी २. ०० ते ३. ०० वाजता याचिकाकर्तीला उत्तरवादी क्रमांक ८चा फोन आला ज्यामध्ये त्यांनी सांगितले की ते नगर-सोलापूर महामार्गावरील माही-जळगाव,

तालुका कर्जत जिल्हा अहमदनगर येथील मल्हार ढाब्यावर याचिकाकर्तीची वाट पाहत आहेत. जर ती हजर राहिली नाही तर संपूर्ण कुटुंबाला निर्णय न झालेल्या अन्य गुन्ह्यांमध्ये अडकवले जाईल अशी धमकी देण्यात आली होती.याचिकाकर्ती कर्जतला गेली आणि संध्याकाळी ७.०० वाजता तिने कर्जत बस स्टँडवर वाट पाहत असल्याचे उत्तरवादी क्र.८ ला फोन करून सांगितले. असा आरोप आहे की सुमारे ७.३० वाजता याचिकाकर्तीच्या वडिलांसह अधिकारी कर्जत बस स्थानकात आले.ते तिच्या वडिलांच्या बोलेरो वाहनातून प्रवास करत होते आणि तिचे वडील तिच्या बहिणीसह इतर अधिकाऱ्यांसह सुमो वाहनात होते.याचिकाकर्तीला बारामतीला नेण्यात आले जेथे ते सुमारे ९. ३० वाजता पोहोचले. तिला तिचा पती जनार्दन आणि तिच्या बहिणीला भेटण्याची परवानगी दिली नव्हती.असा आरोप आहे की सुमारे १०. ३० वाजता एका कॉन्स्टेबलने याचिकाकर्ती आणि तिच्या मुलीला जेवण दिले आणि तिच्या वडिलांना दारूही दिली. त्यानंतर याचिकाकर्तीला कळवण्यात आले की तिच्या पतीचा अपघात झाला आहे आणि त्याला बारामती येथील गिरीराज रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.याचिकाकर्तीचे असे म्हणणे आहे की, ती रात्र याचिकाकर्तीने आपल्या मुलीसोबत गिरीराज रुग्णालयासमोर वाळूवर झोपून काढली होती.याचिकाकर्तीने असे सांगितले की, त्यावेळी तिच्या लक्षात आले की तिचे वडील दबावाखाली होते आणि ते असामान्यपणे वागत होते.दुसऱ्या दिवशी सुमारे ४.०० वाजता, उत्तरवादी क्रमांक ८ आणि उत्तरवादी क्रमांक ७ (बाळासाहेब थोरात , सहाय्यक उपनिरीक्षक) यांनी याचिकाकर्तीला जागे केले आणि तिला कोऱ्या कागदावर अंगठ्याचा ठसा देण्यास सांगितले.चौकशी केली असता, तिला सांगण्यात आले की तिच्या पतीला अपघातात दुखापत झाली आहे आणि त्याच्या शस्त्रक्रियेसाठी अंगठ्याचा ठसा आवश्यक आहे.

८. पहाटे ४.३० च्या सुमारास याचिकाकर्तीला गिरिराज हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आणि तिच्या पतीचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. मरणोत्तर पंचनामा करण्यात आला.

याचिकाकर्तीचे असे म्हणणे आहे की, सुमारे ९.०० वाजता जेव्हा ती तिच्या बहिणीला भेटली तेव्हा तिच्या बहिणीने जनार्दनला पोलिसांनी मारहाण केल्याचे उघड केले. याचिकाकर्तीच्या म्हणण्यानुसार, तिच्या बहिणीने तिला सांगितले की पोलिसांनी तिच्यावर आणि तिच्या वडिलांवर देखील हल्ला केला.शवविच्छेदन केल्यानंतर पोलिसांनी याचिकाकर्ती, तिचे वडील आणि तिची बहिण यांना मृतदेहासह ताब्यात घेतले. याचिकाकर्तीच्या म्हणण्यानुसार, ही घटना इतर कोणासमोर उघड केल्यास त्याची गंभीर परिणाम भोगावे लागतील अशी धमकी त्यांना देण्यात आली होती. पोलीस अधिकाऱ्यांनी तिला सांगितले की त्यांनी बारामती येथे मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतला आहे.याचिकाकर्ती आणि तिच्या वडिलांनी पोलिसांना सांगितले की, त्यांच्या समाजाच्या प्रचलित असलेल्या विधीनुसार मृतदेह दफन करणे आवश्यक आहे.याचिकाकर्तीच्या वडिलांनी पोलिसांना सांगितले की ते मृतदेह त्याच्या बोलेरो जीपद्वारे अंत्यसंस्कारासाठी गावी नेण्यास इच्छुक होते.त्यानंतर पोलिसांनी त्या सर्वांना जबरदस्तीने बारामती येथील अमरधाम स्मशानभूमीत नेले आणि तिथे मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.असे नमूद करण्यात आले आहे की, अंत्यसंस्काराच्या वेळी काही व्यक्ती स्मशानभूमीत आल्याने पोलिसांची तिथून पळ काढला. दोन पोलीस अधिकाऱ्यांनी याचिकाकर्ती, तिचे वडील आणि बहिणीला एका लॉजमध्ये नेले आणि त्यांना १८ जून २००९ पर्यंत तेथेच ठेवले.याचिकाकर्तीला कळले की स्मशानभूमीला भेट देणारे लोक स्थानिक वृत्तपत्रांचे पत्रकार होते.या प्रकरणात असे समोर आले आहे की, बारामती शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक असलेले उत्तरवादी क्रमांक २, श्री. मोरे, उत्तरवादी क्र.७ आणि उत्तरवादी क्र.८ यांनी याचिकाकर्तीला, तिचे वडील व बहिणीला सदर घटना इतर कोणासमोर उघड केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील अशी धमकी दिली. सदर लॉजमध्ये पोलिसांनी याचिकाकर्ती, तिचे वडील आणि बहिणीला मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.सदर प्रकरणात

असे समोर आले आहे की, त्यानंतर पोलिसांनी बोलेरो जीपसाठी चालकाची व्यवस्था केली आणि याचिकाकर्ती, तिचे वडील आणि बहिणीला माही-जळगाव येथे नेण्यात आले. असा आरोप करण्यात आला आहे की , जनार्दनचा मृत्यू आणि पोलिसांच्या हल्ल्यामुळे याचिकाकर्ती, तिचे वडील आणि बहिणीस जबर धक्का बसला असून ते पोलिसांच्या दबावाखाली होते.वर्तमानपत्रात छापलेल्या सदर  घटनेच्या बातम्यांच्या वृत्तपत्रांच्या कात्रणांवर भर ठेवण्यात आला आहे .

९. याचिकाकर्तीने  निदर्शनास आणून दिले की संजय बी. बनसोडे आणि कलुराम चौधरी या व्यक्तींनी महाराष्ट्र मानवाधिकार आयोगाकडे तक्रार दाखल करून तिच्या पतीच्या कोठडीत झालेल्या मृत्यूची चौकशी करण्याची विनंती केली.पोलिस उपअधीक्षक मेघश्याम मालेगावकर आणि पोलिस उपअधीक्षक एस.ए.के. मुजावर (गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे) यांनी त्यांचे अहवाल मानवाधिकार आयोगाकडे दाखल केले आणि मानवाधिकार आयोगाने त्याबाबत काही निर्देश जारी केले.असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, मानवाधिकार आयोगाने असे निरीक्षण नोंदवले आहे की शव विच्छेदन नोंदीमध्ये वर्णन केलेली दुखापत क्रमांक २ ही शरीर भेदी जखम ( punctured wound ) आहे जी एखाद्या व्यक्तीला गोळी लागल्यावरच शक्य होते.

१०. याचिकाकर्तीच्या  पतीची  कोठडीत झालेल्या मृत्यूची चौकशी व्हावी यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या आंदोलनाचा संदर्भ देण्यात आला आहे. उपविभागीय दंडाधिकारी, बारामती यांनी याचिकाकर्ती आणि इतरांचे जबाब नोंदवले होते. असा आरोप आहे की, जेव्हा याचिकाकर्ती, तिचे वडील आणि बहिणीचे जबाब याचिकाकर्तीच्या घरात नोंदवले गेले, तेव्हा घराचे दरवाजे आणि खिडक्या बंद करण्यात आल्या आणि उपविभागीय दंडाधिकारी श्री. देशमुख यांनी याचिकाकर्तीला धमकी दिली आणि सांगितले की जर तिने पोलिस अधिकाऱ्यांवर आरोप केला तर तिला त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. याचिकाकर्तीच्या म्हणण्यानुसार,

उपविभागीय दंडाधिकारी श्री देशमुख यांनी तिला कळवले की तिने पोलिसांविरुद्धची तिची तक्रार मागे घेतल्यास ते उत्तरवादी क्रमांक २ यांस तिला ३ लाख रुपये देण्यास सांगतील.

११. असा दावा करण्यात आला आहे की, याचिकाकर्तीच्या पतीला अटकेमध्ये न दाखवता १४ जून २००९ पासून बेकायदेशीरपणे स्थानबद्ध करण्यात आले आणि त्याला विद्वान दंडाधिकारी यांच्यासमोरही हजर करण्यात आले नाही.असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे कि, जरी कर्जत, राशीन आणि भिगवण येथे सरकारी रुग्णालये असले तरी याचिकाकर्तीच्या पतीला काही अंतर प्रवास करून बारामतीला नेण्यात आले आणि तत्पूर्वी त्याला प्राथमिक उपचारही देण्यात आले नाहीत.

१२. याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, पोलिसांच्या म्हणण्यानुसार, याचिकाकर्तीच्या पतीला १० चाके असलेल्या ट्रकने अपघात झाला.असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, त्या ठिकाणी दोन जीप आणि ५ ते ६ पोलीस कर्मचारी उपस्थित असूनही ट्रकचा नोंदणी क्रमांक नोंदवला गेला नाही किंवा ट्रकचा पाठलाग करण्याचा कोणताही प्रयत्न केला गेला नाही. असे निदर्शनास आणून दिले आहे की सदर ठिकाणापासून सुमारे २० किमी अंतरावर टोलनाका आहे जिथे सदर ट्रक सहजपणे पकडला गेला असता. असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, प्रत्यक्षात असा कोणताही अपघात झाला नव्हता आणि पोलिसांनी तिच्या पतीवर केलेल्या निर्दयी हल्ल्यामुळे तिच्या पतीचा मृत्यू झाला. असे निदर्शनास आणून दिले आहे की, सहा महिन्यांच्या कालावधीनंतर म्हणजेच २४ जानेवारी २०१० रोजी अज्ञात ट्रकच्या चालकावर बेदरकार व निष्काळजीपणे गाडी चालवल्याचा आरोप करत कर्जत पोलीस ठाण्यात प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला होता. याचिकाकर्तीने म्हटले आहे की, काही पोलिस अधिकाऱ्यांकडे परवाना नसलेल्या रिव्हॉल्व्हर्स होत्या आणि बारामती पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांच्या हातून गोळी लागल्याने तिच्या पतीचा मृत्यू झाला, अशी माहिती तिला

स्थानिकांकडून मिळाली आहे. असा युक्तिवाद करण्यात आला आहे की मृत जनार्दनच्या शरीरावर आढळल्या शरीरभेदी (punctured wound) जखमेवरून ही वस्तुस्थिती अगदी स्पष्ट होत आहे. तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांवर हे आरोप करण्यात आले आहेत.याचिकेमध्ये अशी विनंती करण्यात आली आहे की, उत्तरवादींविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ आणि २०१ सह कलम ३४ अंतर्गत त्वरित गुन्हा नोंदवण्याचे निर्देश देण्यात यावेत.दुसरी प्रार्थना तपासाच्या हस्तांतरणाविषयीची आहे.तिसरी प्रार्थना ही १० लाखांच्या नुकसानभरपाईसाठी आहे.

१३. उत्तरवादी क्रमांक २ श्री. गणेश आनंदराव मोरे यांनी त्यांचा जबाब दिनांक २ ऑगस्ट २०११ रोजीच दाखल केले आहे.पोलीस उपअधीक्षक श्री.एस.ए.के. मुजावर संलग्रित गुन्हे अन्वेषण विभाग (गुन्हा), पुणे, महाराष्ट्र राज्य यांनी सविस्तर प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. केलेल्या चौकशीची कार्यवाही नोंदीवर घेण्यासाठी राज्य सरकार द्वारे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.श्री. मुजावर यांनी आणखी एक प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे ज्यात स्टेशन डायरीच्या उताऱ्यांच्या छायांकित प्रती जोडल्या गेल्या आहेत आणि दोषी पोलिस अधिकाऱ्यांना बजावलेल्या कारणे दाखवा नोटीसच्या प्रती देखील जोडल्या आहेत.उत्तरवादी क्र.७ ते १२ यांच्या वतीने उत्तरवादी क्र.७ श्री. बाळासाहेब थोरात यांनी जबाब दिला आहे. त्यांच्या जबाबामधील युक्तिवाद असा आहे की, जनार्दनला कधीही अटक करण्यात आली नव्हती आणि तो एका गुन्ह्याच्या तपासात पोलिसांसोबत होता. १६ जून २००९ रोजी संध्याकाळी सुमारे ७.०० वाजता जेव्हा पोलिसांचे पथक एका ढाब्यावर पोहोचले, तेव्हा जनार्दन शौचासाठी जाण्याच्या बहाण्याने रस्त्याच्या दिशेने धावू लागला आणि त्यामुळे पोलिस अधिकाऱ्यांनी त्याचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. असा आरोप करण्यात आला आहे की, पोलिस कॉन्स्टेबल श्री. जाधव अडखळून पडले. त्यावेळी एक ट्रक सोलापूरच्या दिशेने जात होता.जनार्दनने सदर ट्रक ओलांडला आणि

डावीकडे वळत असताना ट्रकने त्याला धडक दिली.त्यानंतर सदर जनार्दनला कर्जत बसस्थानकावर नेण्यात आले जेथे याचिकाकर्ती त्यांची वाट पाहत होती. त्यानंतर ०९.१५ च्या सुमारास बारामती येथे डॉ.गोकुळ काळे यांच्याकडे त्याला नेण्यात आले, त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना त्यास गिरीराज रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला. बारामती येथील गिरीराज रुग्णालयात त्यास मृत घोषित करण्यात आले. याचिकाकर्तीने केलेले विविध आरोप फेटाळण्यात आले आहेत.संपूर्ण प्रकरणाचा तपास करणाऱ्या विविध अधिकाऱ्यांच्या विविध अहवालांवर भर देण्यात आला आहे.

१४. याचिकाकर्त्याची बाजू मांडणाऱ्या विद्वान वकिलाने आम्हाला याचिकेत केलेले दावे, याचिकेचे परिशिष्ट आणि प्रतिज्ञापत्रांचे उत्तर आणि त्याच्याशी संबंधित विविध परिशिष्टे दिली आहेत. याचिकाकर्त्याला १४ जून २००९ पासून अटक न दाखवता आणि त्याला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर न करता बेकायदेशीरपणे ताब्यात घेण्यात आले होते, असे त्याचे म्हणणे आहे. त्यांनी निदर्शनास आणून दिले की अपघाती मृत्यूची घटना स्पष्टपणे संशयास्पद आहे कारण संबंधित अधिकाऱ्यांनी स्थानिक पोलिस स्टेशन अर्थात कर्जत पोलीस ठाण्यात कोणताही अहवाल दाखल केला नाही. मृतदेहावर अंत्यसंस्कार होईपर्यंत कर्जत पोलीस स्टेशन. त्यांनी सादर केले की स्थानिक पोलिस स्टेशनला माहिती न देता, जखमी अवस्थेत असलेल्या कथित जनार्दनला बारामतीला नेण्यात आले जेथे त्याला मृत म्हणून दाखवण्यात आले. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, त्यांच्या स्वतःच्या प्रकरणानुसार, पोलीस अधिकाऱ्यांनी मृत जनार्दनला प्राथमिक उपचारही दिले नाहीत. बारामती येथे मृताच्या अंत्यसंस्कारानंतरच स्थानिक पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी निदर्शनास आणून दिले की सुरुवातीच्या टप्प्यात विविध पोलिस अधिकाऱ्यांनी घेतलेल्या भूमिकेमध्ये असा आरोप करण्यात आला होता की मृत व्यक्तीने स्वतःला ट्रकखाली झोकून देऊन आत्महत्या

केली. त्यांनी सादर केले की, त्यानंतरच पोलिसांनी ट्रक चालकाचा निष्काळजीपणा असल्याचे प्रकरण उघडकीस आणले आहे. पोलिसांच्या अनेक कृतींशी संबंधित घोर बेकायदेशीरपणा असल्याचे त्यांनी सांगितले. जनार्दनला अटक झाल्याचे न दाखवता त्याला खासगी वाहनातून अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत येथे नेण्यात आल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, पोलिसांच्या प्रकरणानुसार, याचिकाकर्त्याच्या बहिणीच्या घरातील डी. व्ही. डी. प्लेयर कोणत्याही जप्ती पंचनामाची अभिलेखन न करता जप्त करण्यात आला. पुरावा कायद्याच्या कलम २७ अंतर्गत कोणतेही शोध निवेदन अभिलेखनवले गेले नाही. पोलीस दलात महिला हवालदार नसतानाही याचिकाकर्त्याच्या बहिणीला पोलीस दलाने ताब्यात घेतल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

१५. पोलिसांनी केलेले प्रकरण खरे आहे असे गृहीत धरून, अहमदनगर जिल्ह्यात आजूबाजूला अनेक रुग्णालये असताना, दोन तासांपेक्षा जास्त प्रवास करण्याचे वचन देऊन, मृत व्यक्तीला बारामतीला नेण्यात आले, असे त्यांनी सांगितले. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांच्या विविध चौकशीच्या विविध अहवालांकडे आमचे लक्ष वेधले आणि पोलिसांनी तयार केलेले संपूर्ण प्रकरण बनावट असल्याचे आवाहन केले. त्यांनी निदर्शनास आणून दिले की याचिकाकर्ते, तिचे वडील आणि तिच्या बहिणीला धमक्या देण्यात आल्या होत्या आणि खरे तर बारामती येथे मृत व्यक्तीवर जबरदस्तीने अंत्यसंस्कार केल्यानंतर त्यांना लॉजमध्ये डांबण्यात आले होते. डी के बसू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य **(एआयआर १९९७ स.न्या. ६१०)**या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयासह सर्वोच्च न्यायालय आणि या न्यायालयाच्या विविध निर्णयांवर त्यांनी भर दिला आहे. त्यांनी निकालाच्या पुढील भागात हाताळल्या गेलेल्या इतर विविध निकालांचा संदर्भ दिला आहे. या टप्प्यावर, आपल्याला हे लक्षात घेणे आवश्यक आहे की विद्वान ए पी पी यांनी या खटल्यात निःपक्षपातीपणे युक्तिवाद केला आहे आणि न्यायालयाला न्याय्य मदत केली आहे.

१६. प्रतिवादी क्रमांक ३, ४ आणि ५ साठी उपस्थित असलेले विद्वान ए पीपी श्री. सस्ते यांचे निवेदन आम्ही ऐकले. येथे हे नमूद करणे आवश्यक आहे की, आधीच्या तारखांपैकी एका तारखेला, विद्वानांनी या न्यायालयासमोर ६ मार्च २०१२ रोजी एक शासन निर्णय सादर केला ज्याद्वारे राज्य सरकारने नुकसानभरपाई म्हणून रु. याचिकाकर्त्याला एक लाख रुपये भरपाई मंजूर केली आहे. श्री. मुजावर, पोलीस उपअधीक्षक, सी आय डी , महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सूचनेनुसार विद्वान एपीपी यांनी निवेदने दिली आहेत. जनार्दनला अटक करण्यात आली होती का, या प्रश्नावर राज्याच्या भूमिकेबाबत न्यायालयाने प्रश्न विचारला असता त्यांनी निदर्शनास आणून दिले की, ही कोठडीतील मृत्यूची केस होती आणि जनार्दनला अटक करण्यात आली होती, अशी राज्याची भूमिका आहे. चौकशीत नोंदवलेल्या विविध साक्षीदारांच्या जबाबात आणि स्वतः याचिकाकर्त्याच्या, तिच्या बहिणीच्या आणि तिच्या वडिलांच्या जबाबात त्यांनी आम्हाला घेतले आहे. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, स्वतंत्र साक्षीदारांनीही जनार्दनच्या अपघाती मृत्यूबद्दल सांगितले आहे. पुणे जिल्ह्यातील बारामती पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी त्याला अटक न करता तपासाच्या उद्देशाने अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत येथे घेऊन जाऊ शकले असते का, असा प्रश्न विचारण्यात आला असता, तेव्हा त्यांनी सांगितले की मृत व्यक्तीला त्याच्या संमतीशिवाय तपासाच्या उद्देशाने नेले जाऊ शकले नसते. मात्र, आदेशानुसार त्यांनी सांगितले की, १६ जून २००९ रोजी मृत व्यक्तीला कर्जतला नेण्यापूर्वी ताब्यात घेण्यात आले होते. राज्याच्या अधिकाऱ्यांनी मृताच्या मृत्यूला कोठडीतील मृत्यू मानले आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले. सूचनांवर त्यांनी असेही सांगितले की अटक पंचनामा झालेला नाही आणि मृत जनार्दनच्या अटकेची स्टेशन डायरीमध्ये नोंद नाही. जनार्दनला चौकशीसाठी अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत येथे नेण्याबाबत स्टेशन डायरीमध्ये कोणतीही नोंद नाही, असे त्यांनी सांगितले. कोणत्याही चौकशीतील कोणत्याही अधिकाऱ्याने प्रतिवादी क्रमांक ८ (पोलीस हवालदार

निकम) यांच्या सेल फोनचा तपशील आणि याचिकाकर्त्याच्या सेल फोनचा तपशील मागितला आहे का, असा प्रश्न विचारले असता, त्यांनी सांगितले की अशी कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, एका चौकशीत, ज्या वाहनाद्वारे मृत जनार्दनला नेण्यात आले होते त्या वाहनाच्या चालकाचा जबाब नोंदवण्यात आला आहे. त्याने सादर केले की, असे आढळून आले आहे की हे प्रकरण मृत व्यक्तीला ट्रकने दिलेल्या धावामुळे झालेल्या अपघाताचे आहे. बेपर्वाईने आणि निष्काळजीपणे वाहन चालवल्याबद्दल अज्ञात ट्रक चालकाच्या विरोधात दाखल केलेल्या 'अ ' समरी   च्या आधारे तपास करण्यात आला आणि 'अ समरी    अहवाल सादर करण्यात आला आहे आणि या अहवालावर, आजपर्यंत, विद्वान दंडाधिकाऱ्यांनी कोणताही आदेश दिलेला नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले. तिचे म्हणणे असे आहे की, तिला, तिच्या वडिलांना आणि बहिणीला दिलेल्या धमक्यांसंबंधी आणि प्रतिवादी ८ ने केलेल्या मागणी याचिकाकर्त्याच्या खटल्यात काहीही तथ्य नाही. पोलिसांनी केलेल्या हल्ल्यामुळे जनार्दनचा मृत्यू झाला असा आरोप सिद्ध झालेला नाही आणि पोलीस कोठडीत असताना या अपघातात झालेल्या दुखापतीमुळे जनार्दनचा मृत्यू झाल्याचे हे प्रकरण आहे, असे त्यांनी सांगितले.

१७. दुसऱ्या प्रतिवादीची बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील श्री. मुंदार्गी यांनी आम्हाला दुसऱ्या प्रतिवादीच्या भूमिकेकडे नेले आहे. जनार्दनच्या घटनेत दुसऱ्या प्रतिवादीचा कोणताही सहभाग नाही, असे त्यांनी नमूद केले. मात्र, उपलब्ध नोंदींच्या आधारे त्यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यांनी प्रतिज्ञापत्राच्या विविध भागांकडे लक्ष वेधले आणि विशेषतः, ज्यात असे म्हटले आहे की जेव्हा त्यांना प्रतिवादी ७ कडून अपघाताची माहिती मिळाली, तेव्हा त्यांनी प्रतिवादी ७ ला मृत व्यक्तीला जवळच्या रुग्णालयात नेण्याचे आणि जवळच्या पोलिस स्टेशनला कळवण्याचे निर्देश दिले. दुसऱ्या प्रतिवादीचा विचार केला तर त्याने त्याचे कर्तव्य पार पाडले आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यांनी आपल्या प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद ३० कडेही आमचे लक्ष वेधले आहे, ज्यामध्ये

कर्जत पोलीस ठाण्यात २००६ आणि २००७ मध्ये मृत जनार्दन यांच्याविरुद्ध नोंदवलेल्या तीन गुन्ह्यांचा उल्लेख आहे. उपविभागीय दंडाधिकारी, पोलीस उपअधीक्षक( सीआयडी ) पुणे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती यांनी केलेल्या चौकशीच्या अहवालांकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यांनी सादर केले की चौकशीत नोंदवलेल्या याचिकाकर्त्याच्या विधानांवरूनही असे दिसून येते की या याचिकेत केलेले आरोप स्पष्टपणे पश्चातबुद्धी  आहेत. मृत जनार्दनचा मृत्यू अपघातामुळे झाल्याचेही या विधानांवरून सूचित होते, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी सादर केले की प्रतिवादी  ८ ने रकमेच्या मागणी करणे केलेले प्रकरण स्पष्टपणे पश्चातबुद्धी  आहे आणि याचिकाकर्ते आणि तिच्या नातेवाईकांनी कोणत्याही अधिकाऱ्याने नोंदवलेल्या कोणत्याही विधानातून ते प्रतिबिंबित होत नाही. त्यांनी सादर केले की, जोपर्यंत प्रतिवादी २  चा संबंध आहे, संबंधित वेळी ते वरिष्ठ पोलिस निरीक्षक होते आणि केवळ अधीनस्थ पोलिस अधिकाऱ्यांवर देखरेख ठेवणे हे त्यांचे कर्तव्य होते आणि कोणत्याही चूकसाठी त्यांना जबाबदार धरले जाऊ शकत नाही. त्यांनी सादर केले की, जर चौकशीच्या नोंदी तपासल्या गेल्या तर हे अगदी स्पष्ट होते की मृत्यू हा पूर्णपणे अपघाती मृत्यू होता.

१८. आम्ही प्रतिवादी ७ ते १२ साठी हजर असलेल्या विद्वान वकिलाला देखील ऐकले. प्रतिवादी २ साठी विद्वान वरिष्ठ वकिलांनी सादर केलेल्या काही सबमिशनचा स्वीकार करताना, त्यांनी आम्हाला नोंदवलेल्या कागदपत्रांमधून नेले आहे. त्यांनी सादर केले की २४ जुलै २००९ रोजी प्रतिवादीच्या निवेदनाच्या प्रतीवरून असे दिसून येते की त्यांनी अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत पोलिस ठाण्यात अपघाताचा अहवाल दाखल केला होता, परंतु राज्य सरकारने हा गुन्हा नोंदवला नाही. प्रकरण ताब्यात घेण्यात आले. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, ही तक्रार नोंदवली गेली नसल्यामुळे, २४ जानेवारी २०१० रोजी, या प्रतिवादीने पुन्हा पोलिस ठाण्यात संपर्क साधला आणि एफआयआर  दाखल केला. त्यांनी सादर केले की चौकशीत सर्व

प्रतिवादींची विधाने नोंदवली गेली आहेत ज्यामुळे हे अपघाताचे प्रकरण असल्याचे उघड होते. याचिकेत केलेले सर्व आरोप पश्चातबुद्धी आहेत याकडे त्यांनी लक्ष वेधले. एफआयआर नोंदणीचा प्रश्नच उद्भवत नसल्याने याचिकेत कोणताही दिलासा दिला जाऊ शकत नाही, असे त्यांनी सांगितले. भारतीय दंड संहितेच्या कलम ३४ सह वाचन केलेल्या कलम ३०२ आणि २०१ अंतर्गत गुन्हा करण्यासाठी. तो सादर करतो की याचिका कोणत्याही गुणवत्तेपासून वंचित आहे आणि ती नाकारण्यास पात्र आहे.

१९. विदवान एपीपी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या काही निर्णयांवर भर दिला आणि सादर केले की, याचिकाकर्त्याकडे वैधानिक उपाय उपलब्ध असल्याने, सामान्यपणे, हे न्यायालय एफआयआर नोंदण्याची निर्देश देणारी रिट जारी करू शकत नाही.

२०. सादर केलेल्या गोष्टींवर आम्ही काळजीपूर्वक विचार केला आहे. आम्ही याचिका, याचिकेतील सर्व परिशिष्टे, उत्तर प्रतिज्ञापत्र आणि उत्तर प्रतिज्ञापत्रातील परिशिष्टांचा अभ्यास केला आहे. दुसऱ्या प्रतिवादीने तसेच सातव्या प्रतिवादीने त्यांच्या प्रतिज्ञापत्रात घेतलेल्या भूमिकेचा संदर्भ देणे आवश्यक असेल. नोंदीत ठेवलेल्या सर्व कागदपत्रांचा संदर्भ देणे देखील आवश्यक असेल. त्याची जाहिरात करण्यापूर्वी, राज्याने मान्य केलेली भूमिका लक्षात घ्यावी लागेल की, किमान १६ जून २००९ रोजी पोलीस पथक बारामती पोलीस ठाण्यातून कर्जतला जाण्यापूर्वी, मृत जनार्दनला अटक करण्यात आली होती. अटकेचा कोणताही पंचनामा नोंदवला गेला नाही आणि अटकेच्या स्टेशन डायरीमध्ये आणि मृत व्यक्तीला तपासाच्या उद्देशाने अहमदनगर जिल्ह्यात नेण्यात आले होते या वस्तुस्थितीची नोंद नाही, हे देखील एक मान्य मत आहे.

२१. सर्वप्रथम, आम्ही बारामती शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक असलेल्या दुसऱ्या प्रतिवादीच्या प्रतिज्ञापत्राचा संदर्भ देतो. त्याने खुलासा केला आहे की एपीआय भोसले हे गुन्हा क्रमांक ९९/२००९ चे तपास अधिकारी होते. भारतीय दंड संहितेच्या कलम ४५४, ४५७, ३८० अंतर्गत दंडनीय गुन्ह्यांसाठी बारामती शहर पोलिस ठाण्यात गुन्हा २००९ च्या ९९ ची नोंद करण्यात आली. या गुन्ह्याच्या तपासात १४ जून २००९ पासून उचललेली पावले त्याने सांगितली आहेत. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, तपासात जनार्दनचे नाव समोर आले आणि त्यामुळे पोलीस अधिकाऱ्यांनी उक्त जनार्दनची चौकशी करण्यासाठी माही-जळगाव गावाला भेट दिली. उक्त जनार्दन त्याच्या घरी नव्हता आणि म्हणून प्रतिवादी ८ निकमने आपला सेल फोन नंबर जनार्दनच्या सासूला दिला आणि त्याला उक्त सेल फोन नंबरवर संपर्क साधण्यास सांगितले. असे म्हटले जाते की, १४ जून २००९ रोजी अधिकाऱ्यांनी जनार्दनला सुमारे साडे सहा वर बारामती पोलिस ठाण्यात आणले. हे लक्षात घेणे योग्य आहे की प्रतिवादी २ ने विशेषतः असे म्हटले आहे की त्याच्या पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांनी जनार्दनला बारामतीला आणले. यावरून असे दिसून येते की पोलीस अधिकाऱ्यांनी १४ जून २००९ रोजी जनार्दनला ताब्यात घेतले आणि त्यांनी त्याला बारामतीला आणले. त्या दिवशी पोलिसांकडे त्याला अटक करण्यासाठी पुरेसे पुरावे नसल्यामुळे त्याला जाण्याची परवानगी देण्यात आली आणि त्याला दुसऱ्या दिवशी पोलिस ठाण्यात हजर राहण्यास सांगण्यात आले. असे म्हटले जाते की, जनार्दन १५ जून २००९ रोजी पोलिस ठाण्यात हजर होता आणि प्रतिवादी ७ आणि प्रकटीकरण शाखेचे अधिकारी त्याची चौकशी करत होते. त्यानंतर त्याला दुपारच्या जेवणानंतर परत येण्यास सांगण्यात आले. तो परत आला आणि पर्यंत त्याची चौकशी करण्यात आली. त्याने कोणतीही माहिती न दिल्याने, अधिकाऱ्यांना त्याच्याकडे गावाकडे अधिक माहिती मिळवण्यासाठी

जाण्यास सांगण्यात आले. आणि जनार्दनला दुसऱ्या दिवशी पोलीस ठाण्यात पाचारण करण्यात आले.

२२. परिच्छेद ७ मध्ये, प्रतिवादी २ ने असे म्हटले आहे-.

> "..... त्यानंतर सुमारे ७-४५ वाजता सकाळी पोलीस कर्मचाऱ्यांनी बारामती शहर पोलीस ठाणे जनार्दनला सोबत घेऊन ठाणे दैनंदिनीत नोंद घेऊन सोडले. मी निवेदन करतो की, मला माझ्या स्टाफ् ने दिनांक १५-०६-२००९ रोजी रात्री ९-३० वाजता माही जळगावला जाण्याबद्दल माहिती दिली. मी निवेदन करतो की, मी दिनांक १५-०६-२००९ रोजी रात्री ९-३० गुन्ह क्रमांक ९९-२००९ तपासा संदर्भात पोलिसांच्या माही जळगावला जाण्याची माहिती पोलीस अधीक्षकांना दिली होती. या बिनतारी संदेशाची प्रत् जोडली असून त्याला निशाणी आर १ देण्यात आला. "

या टप्प्यावर, आम्ही नोंद घेऊ शकतो की प्रतिवादी ६ च्या प्रतिज्ञापत्रासह, स्टेशन डायरीची छायाप्रती या न्यायालयासमोर सादर करण्यात आली आहे. १६-०६-२००९ रोजी सकाळी ७-४५ वाजता वरील स्टेशन डायरीतील नोंद दर्शवते की, गुन्हा २००९ च्या ९९ च्या संदर्भात प्रतिवादी ७ ते १२ कर्जतला गेले. मात्र, स्टेशन डायरीमध्ये मृत जनार्दनला पोलीस पथकासोबत नेण्यात आल्याचा कोणताही संदर्भ दिलेला नाही. दुसऱ्या प्रतिवादीने १५-०६-२००९ रोजी त्याने ९-३० रात्री पाठवलेल्या बिनतारी संदेशावर भर दिला ज्यामध्ये बारामती शहर पोलिस ठाण्याशी संलग्न असलेल्या एका अधिकाऱ्याला आणि सहा पोलिस कर्मचारीवर्ग यांना गुन्हा क्रमांक ९९-२००९ च्या संदर्भात अहमदनगरला भेट देण्याची परवानगी मागितली गेली होती. या बिनतारी संदेशातही, मृत जनार्दन यांना त्यांच्याबरोबर नेले जात होते या वस्तुस्थितीचा कोणताही संदर्भ नाही. अधीक्षकांनी परवानगी दिली हे दर्शवणारी कोणतीही नोंद केलेली नाही.

२३. दुसऱ्या उत्तरवादीचे प्रतिज्ञापत्र परत बघता, परिच्छेद ९ मध्ये त्याने सांगितले की जनार्दनने पोलिसांना सांगितले की त्याने चोरलेला डी. व्ही. डी. प्लेअर जामखेड येथील त्याच्या मेहुणीच्या घरी ठेवला आहे. त्यानुसार, पोलीस अधिकारी जामखेडला गेले आणि त्यांनी याचिकाकर्तीच्या बहिणीकडून डीव्हीडी प्लेअर जप्त केला. याची नोंद घेणे प्रसंगोचित ठरेल की या जप्तीचा कोणताही जप्ती पंचनामा झालेला नाही. उत्तरवादी क्र. २ च्या म्हणण्यानुसार, त्यानंतर ज्या पोलीस अधिकाऱ्यांना डीव्हीडी प्लेअर जप्त केल्याची माहिती देण्यात आली होती ते याचिकाकर्तीच्या वडिलांच्या घरी गेले आणि याचिकाकर्तीच्या वडिलांना सांगण्यात आले की जर हा डीव्हीडी चोरीला गेल्याचे आढळून आल्यास त्या संदर्भात पोलीस अधिकारी त्यांच्या मुलीला बारामतीला घेऊन जात होते. हा परिच्छेद सूचित करतो की, याचिकाकर्तीच्या बहिणीला देखील पोलिसांनी ताब्यात घेतले आणि बारामतीला नेले.याची नोंद घेणे प्रसंगोचित ठरेल की, पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकामध्ये एखादी महिला पोलीस कॉन्स्टेबल होती हे सिद्ध झालेले नाही. उत्तरवादी क्र. २ ने सांगितले की याचिकाकर्तीच्या वडिलांनी स्वतःच्या मुलीसोबत माहीजळगावला जाणे स्वतःहून मान्य केले. १६ जून २००९ च्या संध्याकाळी घडलेल्या घटनेबाबत परिच्छेद १० मध्ये त्यांनी असे म्हटले आहे –

> "मी असे सांगतो की पोलीस अधिकारी मल्हार ढाब्यात सुमारे १५. ३० वाजता पोहोचले.तिथे सर्वांनी दुपारचे जेवण केले आणि ते ढाब्यावर थांबले कारण याचिकाकर्तीने तिच्या वडिलांना मोबाईलवर सांगितले की ती तेथे येत आहे आणि त्यांना ढाब्यावर थांबण्याची विनंती केली.मी असे सांगतो की १९. ०० वाजता कॉन्स्टेबल निकमला याचिकाकर्तीचा फोन आला आणि तिने कळवले की ती कर्जत एस.टी. स्थानक येथे आहे आणि पोलीस अधिकाऱ्यांना तेथे येण्याची विनंती केली. पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना तिच्याकडून अधिक माहिती मिळेल या प्रामाणिक

भावनेने कर्जत एस.टी. स्थानकाकडे जाण्यास सहमती दर्शवली. त्यावेळी याचिकाकर्तीचा पती लघुशंकेस जाण्याच्या बहाण्याने रस्त्याकडे धावू लागला, पोलीस अधिकाऱ्यांनी त्याचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. पाठलाग करताना पोलिस हवालदार जाधव पडले आणि त्यावेळी एक ट्रक सोलापूरच्या दिशेने जात होता आणि सदर जनार्दन काळेने हा ट्रक ओलांडला आणि डावीकडे वळताना त्याला ट्रकची धडक लागली. त्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला जीपमध्ये टाकून कर्जत एस.टी. स्थानक येथे आणले जेथे याचिकाकर्ती वाट पाहत होती. त्यानंतर ते रात्री ९. १५ ते ९. ३० च्या सुमारास बारामतीला पोहोचले आणि त्याला डॉक्टर गोकुळ काले यांच्याकडे नेण्यात आले, ज्यांनी त्याला गिरीराज रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला. मी असे सांगतो की त्यावेळी याचिकाकर्तीचे वडील आणि तिची बहीण दोन्ही रुग्णालयांमध्ये उपस्थित होते. हवालदार निकम आणि ए. एस. आय. थोरात यांनी तिच्या अंगठ्याचे ठसे कोऱ्या कागदावर मिळवले होते हे मी नाकारतो. "

अशा प्रकारे, उत्तरवादी क्र. २ ने मांडलेले विशिष्ट प्रकरण असे आहे की, जनार्दन लघुशंकेस जाण्याच्या बहाण्याने रस्त्याकडे धावू लागला.पोलीस अधिकारी त्याचा पाठलाग करू लागले.पाठलाग करताना, पोलिस हवालदार उत्तरवादी क्र. ११ पडले. एक ट्रक सोलापूरच्या दिशेने जात होता आणि जनार्दनने तो ट्रक ओलांडला आणि डावीकडे वळत असताना त्याला ट्रकची धडक लागली. त्याने फक्त असे म्हटले आहे की पोलीस त्याला जीपने कर्जत येथे घेऊन गेले जेथे याचिकाकर्ती वाट पाहत होती आणि त्यानंतर ते सुमारे ९. १५ ते ९. ३० वाजता बारामतीला पोहोचले. भांगळेत्यांच्या मते, ही घटना रात्री ७. ०० वाजता घडली. हे लक्षात घेणे प्रसंगोचित ठरेल की, उत्तरवादी क्र. २ ने त्याच्या प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद २२ मध्ये म्हटले आहे की याचिकाकर्तीचे वडील आणि याचिकाकर्तीच्या बहिणीने आग्रह धरला होता की जखमी

व्यक्तीवर बारामती किंवा अहमदनगर येथील चांगल्या रुग्णालयात उपचार केले जावेत कारण कर्जत येथे कोणतेही मोठे रुग्णालय नव्हते. ए. एस. आय. थोरात यांच्याकडून मोबाईलवर माहिती मिळाल्यानंतर त्यांनी त्यांना त्याला जवळच्या रुग्णालयात नेण्याचे आणि जवळच्या पोलीस ठाण्याला कळवण्याचे निर्देश दिले, असे त्यांनी म्हटले आहे.परिच्छेद २३ मधील प्रतिज्ञापत्राचा पुढील भाग खालीलप्रमाणे :

"मी असे सांगतो की याचिकाकर्तीचे पती जनार्दन काळे याचा अपघात होताच पोलीस अधिकारी त्याच्याकडे धावले आणि त्याला ढाब्यावर आणले. दरम्यान, अचानक घडलेल्या घटनेमुळे प्रत्येकजण जखमीला मदत करण्याचा प्रयत्न करत असल्याने तो ट्रक निघून गेला आणि कोणालाही ट्रकचा क्रमांक कळू शकला नाही.मी असे सांगतो की या अपघातानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी ताबडतोब त्याला जीपमध्ये नेले आणि याचिकाकर्तीच्या वडिलांच्या आणि बहिणीच्या विनंतीनुसार बारामतीकडे निघाले.त्या दिवशी कोणताही अपघात झाला नसल्याचा याचिकाकर्तीचा आरोप मी नाकारतो. मी असे सांगतो की पोलीस अधिकारी जखमीवर अधिक चांगल्या प्रकारे उपचार करण्याचा प्रयत्न करत होते आणि त्यांनी बारामती शहर पोलीस ठाण्याला अपघाताची माहिती दूरध्वनीवरून दिली होती. त्यांनी त्याच दिवशी कर्जत पोलिस स्टेशनला कळवले नाही, मात्र दुसऱ्या दिवशी १७.०६.२००९ रोजी कर्जत पोलिस स्टेशनला अपघाताची माहिती देण्यात आली. सोबत जोडलेला आणि निशाणी आर-२ म्हणून चिन्हांकित केलेली प्रत ही १७.०६.२००९ रोजीच्या अहवालाची आहे. मी असे सांगतो की ए. एस. आय. थोरात यांनी कर्जत पोलीस ठाण्यात २४. ०७. २००९ रोजी अहवाल नोंदवला, मात्र कोणताही गुन्हा नोंदवला गेला नाही.निशाणी आर-३ म्हणून चिन्हांकित केलेली तक्रारीची प्रत येथे सोबत जोडलेली आहे. "

संपूर्ण प्रतिज्ञापत्रात, उत्तरवादी क्र. २ ने हा मुद्दा समोर आणलेला नाही की मृत व्यक्तीला निदान प्राथमिक उपचार देण्यात आले होते.विशेष म्हणजे, त्याच प्रतिज्ञापत्रात, उत्तरवादी क्र. २ ने १७ जून २००९ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना उद्देशून लिहिलेला अहवाल संलग्न केला आहे, ज्यामध्ये बारामती पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या अपघाती मृत्यू अहवालाचा संदर्भ आहे. खुल्या न्यायालयात विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी आम्हाला असे कळवले की या अहवालावर उत्तरवादी क्र. २ ची स्वाक्षरी आहे.हा अहवाल मराठी भाषेत आहे.या अहवालात, उत्तरवादी क्र. २ ने पूर्णपणे वेगळे कथन केले आहे. इंग्रजीत अनुवादित केलेले हे कथन असे आहे की, "याचिकाकर्तीने तिच्या वडिलांना सांगितले होते की ती कर्जतला पोहोचत आहे, त्यामुळे पोलीस अधिकारी मल्हार ढाब्याजवळ वाट पाहत होते.त्यावेळी मृत जनार्दन लघुशंकेला जाण्याच्या बहाण्याने वाहनातून खाली उतरला आणि येणाऱ्या ट्रकच्या दिशेने धावू लागला. त्यानंतर जनार्दनने स्वतःला ट्रकच्या मागच्या चाकाखाली झोकून दिले. "अशा प्रकारे, उत्तरवादी क्र. २ ने १७ जून २००९ रोजी सादर केलेल्या त्याच्या अहवालात म्हटले आहे की, जनार्दनने ट्रकच्या मागच्या चाकाखाली स्वतःला झोकून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की क्लीनरच्या बाजूची चाके जनार्दनच्या मांडीवरून गेली. त्यांनी अहवालात म्हटले आहे की जवळपास कोणत्याही रुग्णालयाची सुविधा नव्हती.

त्याला बारामती येथील डॉक्टर भोईटे यांच्या गिरीराज रुग्णालयात नेण्यात आले जेथे रात्री ११. ३० वाजता त्याला मृत घोषित करण्यात आले.अशा प्रकारे, उत्तरवादी क्र. २ च्या प्रतिज्ञापत्रात आणि १७ जून २००९ रोजीच्या त्याच्या निवेदनात पूर्णतः फरक आहे.त्याच प्रतिज्ञापत्रासोबत, त्यांनी २४ जून २००९ रोजी पोलिस स्टेशन अंमलदार, कर्जत पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर यांनी नोंदविलेले उत्तरवादी क्र. ७ चे निवेदन जोडले आहे , ज्यामध्ये जनार्दन

पळून जाण्याचा प्रयत्न आणि पळून जाण्याचा प्रयत्न करताना ट्रकने त्याला धडक दिल्याची उपपत्ती उत्तरवादी क्र.२ ने मांडली आहे.

२४. या टप्प्यावर, श्री एस.ए.के. मुजावर, पोलीस उप-अधीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण शाखा (गुन्हे), पुणे यांच्या प्रतिज्ञापत्राचा संदर्भ देणे आवश्यक ठरते. त्यांनी पोलीस अधीक्षक, अन्वेषण शाखा, पुणे यांनी १७ जून २००९ रोजी पारित केलेल्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. १७ जून २००९ रोजी दिलेल्या आदेशात पुन्हा असे म्हटले आहे की, मृत जनार्दनने ट्रकच्या मागच्या चाकाखाली स्वतःला झोकून दिले. मात्र, या आदेशात जनार्दनच्या मृत्यूचे वर्णन कोठडीतील मृत्यू असे करण्यात आले आहे.जनार्दनला पोलिसांनी कधीही अटक केली नाही, असे प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद २८ मध्ये उत्तरवादी क्र. २ ने केलेल्या विधानाच्या संदर्भात हे प्रासंगिक आहे.आदेशात असे म्हटले आहे की सरकारी परिपत्रक लक्षात घेता, १७ जून २००९ रोजी दिलेल्या आदेशाअन्वये तपास राज्य गुन्हे अन्वेषण शाखेने हाती घेतला होता, पोलीस अधीक्षकांनी श्री. एन.के. गायकवाड, पोलीस उप-अधिक्षक यांची चौकशी करण्यासाठी नियुक्ती केली. मुजावर यांनी दिलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांनी म्हटले आहे की, १६ जून २००९ रोजी पोलीस अधीक्षकांची परवानगी घेतल्यानंतर पोलीस उप निरीक्षक बाळासाहेब थोरात (उत्तरवादी क्र. ७) हे पोलीस कर्मचारी आणि सदर जनार्दन काळे यांच्यासह जनार्दन काळे यांच्या सासऱ्याच्या घरी गेले. तथापि, उत्तरवादी क्र. २ च्या कथनात असे आले आहे की त्याने १५ जून २००९ रोजी केवळ एक बिनतारी संदेश पोलिस अधीक्षकांना पाठवला होता.हा बिनतारी संदेश त्याच्या प्रतिज्ञापत्रात जोडला गेला आहे आणि त्यावर 'आर-१' अशी निशाणी आहे. पोलिस अधीक्षकांनी परवानगी दिली होती असे उत्तरवादी क्र. २ च्या निवेदनात आलेले नाही. खरे तर, पृष्ठ १२६ वरील प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद ७ मध्ये त्यांचे विधान असे आहे की त्यांनी केवळ पोलीस अधीक्षकांना पोलीस अधिकाऱ्यांच्या माहीजलगाव दौऱ्याची माहिती दिलेली होती. अशा प्रकारे,

उत्तरवादी क्र. २ च्या म्हणण्यानुसार, पोलिस अधीक्षकांकडून अशी कोणतीही परवानगी घेतली गेली नव्हती.

२५. श्री. मुजावर यांच्या प्रतिज्ञापत्रासोबत बारामती पोलीस ठाण्याने १६ जून २००९ रोजी नोंदवलेल्या उत्तरवादी क्र. ७ थोरात यांच्या निवेदनाची प्रत जोडण्यात आली आहे.१६ जून २००९ रोजी सुमारे २३. ५५ वाजता नोंदवलेल्या सदर निवेदनातही उत्तरवादी क्र. ७ ने असा दावा केला आहे की, ट्रकच्या मागच्या चाकाखाली स्वतःला झोकून जनार्दनने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणाचा आणखी एक महत्त्वपूर्ण पैलू आहे.१६ जून २००९ रोजी बारामती शहर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांनी याचिकाकर्तीला उद्देशून लिहिलेले एक पत्र आहे, ज्यामध्ये जनार्दनने ट्रकच्या चाकाखाली उडी मारल्याचे पुन्हा तेच विधान केले आहे.त्यावर याचिकाकर्तीच्या अंगठ्याचा ठसा मिळवल्याचे दिसते. हे निवेदन श्री. मुजावर यांच्या प्रतिज्ञापत्रासोबत जोडण्यात आले आहे.उत्तरवादी क्र. २ मोरे यांनी १७ जून २००९ रोजी बारामती तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांना एक अहवाल दिला, ज्यामध्ये असे म्हटले आहे की मृत व्यक्तीने स्वतःला ट्रकच्या चाकाखाली झोकून दिले .तेच कथन १७ जून २००९ रोजीच्या पंचनाम्यात आढळते.ते प्रतिज्ञापत्राच्या पृष्ठ १७९ वर आहे.१८ जून २००९ रोजीच्या पंचनाम्यात एक वेगळे निवेदन समोर आले आहे.या पंचनाम्यात, जनार्दनने स्वतःला ट्रकखाली झोकून दिल्याची नोंद नाही. असे म्हटले आहे की तो अचानक रस्त्याच्या दिशेने धावू लागला आणि १० चाकी ट्रकखाली आला.श्री. मुजावर यांच्या प्रतिज्ञापत्रासोबत जोडलेले पृष्ठ २०१ वर आणखी एक दस्तऐवज आहे. ज्यावर १७ जून २००९ रोजी बारामती तालुका कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनद्वारे नोंदवला गेलेला मरणान्वेषण पंचनामा आहे.या पंचनाम्यातही, जनार्दनने स्वतःला ट्रकखाली झोकून दिल्याचे म्हटले आहे.स्वतः श्री. मुजावर यांच्या प्रतिज्ञापत्रात जोडण्यात आलेली ही कागदपत्रे आहेत.श्री. मुजावर यांच्या प्रतिज्ञापत्रात, याचिकाकर्तीचे १७ जून २००९ रोजी

नोंदवलेले निवेदन जोडण्यात आले आहे, ज्यामध्ये तिने उत्तरवादी क्र. ८ चा भ्रमणध्वनी क्रमांक उघड केला आहे. या निवेदनात याचिकेत केलेल्या आरोपांचा कोणताही संदर्भ नसल्याचे निदर्शनास आणून ही बाब आधारभूत मानण्याची मागणी करण्यात आली होती.पोलिसांनी १७ जून २००९ रोजी निवेदन नोंदवले आहे हे लक्षात घेणे प्रसंगोचित आहे. हे निवेदन कोणत्या परिस्थितीत आणि कोणत्या पद्धतीने नोंदवले गेले असावे याची आपण कल्पना करू शकतो.याचिकाकर्तीच्या वडिलांचे १७ जून २००९ रोजीचे निवेदन देखील सोबत जोडण्यात आले आहे, ज्यामध्ये असे नोंदवले गेले आहे की मृत व्यक्ती पळून जाऊ लागला तेव्हा त्याचा अपघात झाला.

२६. याचिकाकर्तीची बाजू मांडणाऱ्या विद्वान वकीलांनी असे निदर्शनास आणून दिले आहे की रस्त्यावरील टोल चौकी ही घटनेच्या ठिकाणापासून २० कि. मी. अंतरावर होती. बऱ्याच कालावधीनंतर म्हणजेच २४ मे २०१० रोजी श्री. मुजावर यांनी १६ जून २००९ रोजी टोल नाक्या मधून गेलेल्या ट्रकचा तपशील मागण्यासाठी टोल चौकीच्या व्यवस्थापकाला पत्र लिहिले.व्यवस्थापकाने पत्रास् दिलेल्या उत्तराची नोंद नाही.तथापि, पान २२१ वर १० मार्च २०११ रोजी अहमदनगरच्या पोलीस उपअधीक्षकांनी श्री. मुजावर यांना उद्देशून लिहिलेले पत्र आहे की टोल पोस्टच्या व्यवस्थापकाने त्यांना सांगितले की पोस्टमधून जाणाऱ्या वाहनांची नोंद केवळ २४ तासांसाठीच ठेवली जाते. अशा प्रकारे, २४ मे २०१० पर्यंत माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला. २४ जानेवारी २०१० रोजी उत्तरवादी क्र. ७ यांनी दाखल केलेल्या प्रथम खबरी अहवालाच्या आधारे तपास केल्यानंतर २८ एप्रिल २०११ रोजी सादर केलेला "अ" सारांश अहवाल या प्रतिज्ञापत्रात जोडण्यात आला आहे. त्यात असे म्हटले आहे की ट्रकला १० चाके होती आणि मृत व्यक्तीने पळून जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याला ट्रकची धडक बसली.येथे आपण नोंद घेतली पाहिजे की, उत्तरवादी क्र. ७ ने उशीराने २४ जानेवारी २०१०

रोजी प्रथम खबरी अहवाल दाखल केला होता, ज्यामध्ये असा आरोप आहे की अज्ञात ट्रकचा चालक बेदरकार आणि निष्काळजी होता आणि त्यामुळे १६ जून २००९ रोजीचा गुन्हा हा भारतीय दंड संहितेच्या कलम २७९, ३३८, ३०४ (अ) अंतर्गत दंडनीय गुन्हा होता."अ " सारांश अहवालात असे म्हटले आहे की ट्रक आणि ट्रक चालकाचा शोध लागला नाही.

२७. या टप्प्यावर, मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांनी पारित केलेल्या आदेशाचा संदर्भ द्यावा लागेल.२६ऑक्टोबर २०१० रोजी दिलेल्या आदेशात असे नमूद केले आहे की शवविच्छेदनाच्या नोंदींमध्ये दर्शविलेली जखम क्र. २ असे दर्शवते की मृत व्यक्तीचा मृत्यू या जखमेमुळे झाला. ही बंदुकीच्या गोळीची जखम आहे की नाही या बाबीवर सदर जखमेबाबत तज्ञांचा अभिप्राय घेतला पाहिजे असे मत व्यक्त करण्यात आले.हा आदेश पारित झाल्यानंतर नऊ महिन्यांनी पोलीस उप- अधीक्षकांनी १ ऑगस्ट २०११ रोजी पुणे येथील ससून सामान्य रुग्णालयाच्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांचा अभिप्राय मागवला. संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेला अभिप्राय असा आहे की ही जखम बंदुकीच्या गोळीमुळे झालेली नाही, परंतु अपघातामुळे मांडीच्या हाडांचे तुकडे होवून त्या हाडाच्या टोकदार तुकड्याने ही जखम झाली असावी.

२८. उत्तरवादी क्र. ७ च्या प्रतिज्ञापत्राचा विचार करण्यापूर्वी, आधी सांगितल्याप्रमाणे, स्टेशन डायरीचा उतारा सादर करण्यात आला आहे. १६ जून २००९ रोजी मुद्दा क्र. ४१ वर २३. ५५ वाजता, उत्तरवादी क्र. ७ ने घटनेची नोंद केली आहे, ज्यामध्ये जनार्दनने स्वतःला ट्रकखाली झोकून दिल्याची उपपत्ती पुन्हा नमूद केलेली आहे.

२९. आता आपण उत्तरवादी क्र. ७ बाळासाहेब थोरात यांच्या प्रतिज्ञापत्राकडे वळू .हे लक्षात घेणे प्रसंगोचित ठरेल की उत्तरवादी क्र. २ ने आपल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, त्याने

मोबाईल फोनवरुन उत्तरवादी क्र. ७ ला स्थानिक पोलिस ठाण्यात अहवाल नोंदवण्याचे आणि जनार्दनला जवळच्या रुग्णालयात नेण्याचे निर्देश दिले. उत्तरवादी क्र. ७ च्या प्रतिज्ञापत्रात काय म्हटले आहे हे बघण्यापूर्वी, हे नमूद करणे आवश्यक आहे की १६ आणि १७ जून २००९ रोजी त्या उत्तरवादीने दाखल केलेल्या अहवालातून समोर आलेल्या त्याच्या सुसंगत कथनामध्ये असे म्हटले आहे की, जनार्दनने स्वतःला ट्रकखाली झोकून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. उत्तरवादी क्र. ७ च्या या प्रतिज्ञापत्रात, जनार्दनला अटक करण्यात आल्याचेही नाकारले आहे. प्रतिज्ञापत्रात त्यांनी म्हटले आहे की, उत्तरवादी नंबर १ ने नानासाहेब सारक यांच्याकडून एका जीपची व्यवस्था केली आणि याचिकाकर्त्याला १६ जून २००९ रोजी पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले.या प्रतिज्ञापत्रात पोलीस अधीक्षकांची परवानगी घेण्याचा कोणताही संदर्भ नाही आलेला, केवळ असे म्हटले आहे की उत्तरवादी नंबर २ याने पोलीस अधिकाऱ्यांच्या माही जळगाव दौऱ्याची माहिती पोलीस अधीक्षकांना दिली.हे देखील लक्षात घेणे योग्य आहे की स्टेशन डायरीमध्ये केलेल्या नोंदीसह सर्व अहवालांमध्ये उपरोक्त अधिकाऱ्याने घेतलेली भूमिका असूनही, प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद ९ मध्ये त्याने असे म्हटले आहेः- असे

> "मी म्हणतो की याचिकाकर्त्याच्या पतीचा पाठलाग करताना पोलीस हवालदार जाधव (प्रतिवादी नंबर १०) कोसळला आणि त्यावेळी एक ट्रक सोलापूरच्या दिशेने जात होता आणि म्हणाला की जनार्दन कालेने उक्त ट्रक ओलांडला आणि डावीकडे वळताना त्याला ट्रकची टक्कर मिळाली.मी म्हणतो की त्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला जीपमध्ये नेले आणि कर्जत एसटी स्टँडवर आणले जेथे याचिकाकर्ते वाट पाहत होते.मी सांगतो की, त्यानंतर ते ९. १५ ते ९. ३० च्या सुमारास बारामतीला पोहोचले आणि कारण जनार्दन जानू काळे यांना चांगले उपचार मिळावेत यासाठी त्यांचे सासरे आणि मेहुणे आग्रह धरत होते, कारण कर्जत येथे यापेक्षा चांगले रुग्णालय उपलब्ध

नसल्याने त्यांना बारामती किंवा नगर येथील चांगल्या रुग्णालयात अधिक चांगले उपचार दिले जावेत. "

अशा प्रकारे, १८ फेब्रुवारी २०१२ रोजी या न्यायालयासमोर शपथ घेतलेल्या प्रतिज्ञापत्रात, अशी भूमिका घेतली गेली आहे की मृत जनार्दन पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना त्याला ट्रकची धडक मिळाली. येथे नमूद करणे वावगे ठरणार नाही की प्रतिवादी क्रमांक २ चे प्रतिज्ञापत्र दिनांक २ ऑगस्ट २०११ चे आहे आणि प्रतिवादी क्रमांक ७ चे प्रतिज्ञापत्र १८ फेब्रुवारी २०१२ चे आहे. श्री. मुजावर यांचे पहिले प्रतिज्ञापत्र ३ ऑगस्ट २०११ चे आहे आणि श्री. मुजावर यांचे दुसरे प्रतिज्ञापत्र १४ ऑक्टोबर २०११ चे आहे. अगदी लवकरात लवकर दाखल केलेल्या सर्व अहवालांमध्ये आणि स्टेशन डायरीतील नोंदींमध्ये उत्तरवादी बालासाहेब थोरात यांनी घेतलेली भूमिका विसरले असतील असे गृहीत धरूनही, वरील सर्व अहवालाच्या प्रती या न्यायालयात उपरोक्त प्रतिज्ञापत्रांच्या संलग्नकांद्वारे आधीच दाखल करण्यात आल्या होत्या.त्यांनी घेतलेल्या भूमिकेमध्ये फरक का आहे आणि त्यांनी १६ जून २००९ रोजी सादर केलेल्या अहवालात घेतलेल्या भूमिकेपेक्षा त्यांनी पूर्णपणे वेगळी भूमिका का घेतली आहे हे स्पष्ट करण्यासाठी उत्तरवादीने दिलेल्या प्रतिज्ञापत्रात कोणताही प्रयत्न केला जात नाही.या प्रतिज्ञापत्रात त्यांनी मृत व्यक्तीला प्राथमिक उपचार देण्याचा कोणताही प्रयत्न केला गेला नसल्याचेही म्हटले नाही.अशा प्रकारे, जोपर्यंत उत्तरवादी नंबर २ आणि ७ चा संबंध आहे, त्या घटनेबद्दल दोन विसंगत आणि परस्परविरोधाभासी आवृत्त्या नोंदवलेल्या आहेत.अर्थात, दोन्ही आवृत्त्या खऱ्या असू शकत नाहीत.

३०. या टप्प्यावर, आम्ही नोंद असलेल्या विविध अधिकाऱ्यांच्या अहवालाचा संदर्भ घेऊ शकतो.महाराष्ट्र मानवाधिकार आयोगाच्या आदेशाचा विचार करता, कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही आणि खटला बंद करताना सामाजिक कार्यकर्ता योग्य मंचाकडे जाण्याचे स्वातंत्र्य

राखून ठेवण्यात आले आहे. पहिला अहवाल १५ ऑक्टोबर २०१० रोजीचा उपविभागीय दंडाधिकाऱ्यांचा आहे. पहिला अहवाल १५ ऑक्टोबर २०१० रोजीचा उपविभागीय दंडाधिकाऱ्यांचा आहे. त्यात असे नमूद केले आहे की हाडाच्या कंपाऊंड फ्रॅक्चरमुळे आणि आहे. ऊंड फ्रॅक्चरमुळे रक्तस्त्राव झाल्यामुळे मृत्यू झाला होता.अहवालात विविध विधानांचा संदर्भ देण्यात आला आहे.डॉक्टर गोकुळ यांचे जबाब हा या अहवालाचा भाग आहे हे लक्षात घेणे मनोरंजक ठरेल.डॉक्टरांनी सांगितले की १६ जून २००९ रोजी सुमारे ९.१५ वाजता पोलिस त्याच्याकडे एका रुग्णाला घेऊन आले, ज्याची प्रकृती गंभीर असल्याचे दिसून आले.त्यांनी सांगितले की, त्यांनी खाली उतरून वाहनातील रुग्णाची तपासणी केली असता त्यांना नाडी नसल्याचे व रुग्ण बेशुद्ध असल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांनी त्यांना आयसीयू सुविधा असलेल्या रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला.मृत व्यक्तीला जेथे नेण्यात आले होते ते गिरीराज रुग्णालय चालवणाऱ्या डॉ. आर. आर. भोसले यांच्या जबाबात असे दिसून येते की जेव्हा रुग्णाला ९. ३० वाजता त्याच्याकडे आणण्यात आले तेव्हा रुग्णाची नाडी चालू नसल्याने आणि शरीराची हालचालही नव्हती.त्याने असे म्हटले आहे की शरीर उबदार असल्याने, वाटेत नाडी थांबली आहे असे गृहीत धरून, रुग्णाला हृदय पुनरुज्जीवन देण्यात आले परंतु कोणतेही यश मिळाले नाही आणि म्हणून त्यांनी रुग्णाला ११. ३० वाजता मृत घोषित केले.अशा प्रकारे, पोलिसांच्या म्हणण्यानुसार ही घटना अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत येथे ७ वाजता येथे घडली आणि नागरिकांच्या जीवनाचे रक्षक असलेल्या पोलिसांनी रात्री ९. १५ वाजता प्रथमच मृत व्यक्तीला डॉक्टरकडे आणले. या काळात प्राथमिक उपचारही देण्यात आले नव्हते.उपविभागीय दंडाधिकाऱ्यांच्या या अहवालात, याचिकाकर्त्याचे निवेदन, पोलीस पक्ष ज्या जीपने पुढे गेला त्या जीपचे चालक नानासाहेब सारक यांचे निवेदन आणि याचिकाकर्त्याच्या वडिलांचे निवेदन जोडण्यात आले आहे.याचिकाकर्त्याच्या बहिणीचे निवेदन संलग्न करण्यात

आले आहे, ज्यावर पोलिस अधिकाऱ्यांची बाजू मांडणाऱ्या विद्वान वकील, त्यात अपघाती मृत्यूची कबुली दिली आहे, असे सांगून विश्वास ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.जर निवेदन वाचले तर याचिकाकर्त्याच्या बहिणीने म्हटले आहे की ढाब्यात पोलीस दलाच्या सदस्यांनी दारू प्यायली आणि त्या सर्वांनी जनार्दनला बेल्टने मारहाण केली आणि त्यात जनार्दनला हातकडी घातली होती.

